# अधीक्षक (माध्य.)वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,नासिक

**मोनालिसा इमारत,जुना आग्रा रोड,वाणी हाऊस समोर नाशिक-422001**

**फोन-0253-2594449** **Website-payunitsecnsk.in** **ई मेल-supdtpayunitnsk@gmail.com**

जा.क्र.शिवेपना/माध्य.वेतन देयक/1828/2018-19/ **-: महत्वाची सूचना :-** दिनांक-01/10/2018

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व 20%व 100% अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा,
अध्यापक विद्यालय,सराव पाठशाळा,मनपा शाळा जिल्हा-नाशिक

**विषय :- माहे आक्टोबर - 2018 चे नियमित वेतन देयक ऑफलाईन पध्दतीने सादर करणे बाबत ----**

वरील संदर्भिय विषयान्वये नाशिक जिल्ह्यातील सर्व 20% व 100% अनुदानित माध्यमिक,उच्च माध्यमिक,सराव पाठशाळा कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, **आक्टोबर - 2018** चे नियमित वेतन देयक ऑफलाईन पध्दतीने खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार व सुचनेनूसारच सादर करण्यात यावे.

1) सर्व अनुदानित शाळांनी एकाच दिवशी गर्दी होऊ नये म्हणून खालील दिलेल्या वेळापत्रका प्रमाणेच माहे **आक्टोबर - 2018** चे Offline वेतन देयक कार्यालयात सादर करावे. याची सर्व शाऴांनी नोंद घ्यावी. दिलेल्या वेळापत्रकानुसार ज्या शाळा वेतनदेयक सादर करणार नाहीत. अशा शाळांची वेतन देयके स्विकारले जाणार नाही. व त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य / मुख्याध्यापक यांची राहील.याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | दिनांक | श्री.एल.एन. भोये | श्रीम.एम.पी.वाघमारे | श्री. जगताप आर डी | श्रीम. देशपांडे एन एन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मगंळवार दि. 09/10/2018 | नाशिक- 04510100001 ते 60 | मालेगांव- 04510700001 ते 50 | निफाड 04510900001 ते 55 | समोरील तालुकानिहाय शाळा संलग्न असणारे उच्च माध्यमिक शाळा |
| 2 | गुरूवार दि. 11/10/2018 | नाशिक- 04510100061 ते 116 | मालेगांव- 04510700051 ते 109, 04510100120 | येवला- 04511300001 ते 35 | समोरील तालुकानिहाय शाळा संलग्न असणारे उच्च माध्यमिक शाळा |
| 3 | शुक्रवार दि. 12/10/2018 | सटाणा 04510200001 ते 53 त्रबंक 04511400001 ते 04 | इगतपुरी 04510500001 ते 32 कळवण 04510600001 ते 17 | सिन्नर- 04511100001 ते 45 | समोरील तालुकानिहाय शाळा संलग्न असणारे उच्च माध्यमिक शाळा |
| 4 | सोमवार दि. 15/10/2018 | दिंडोरी 04510400001 ते 37 नांदगाव 04510800001 ते 15 | देवळा 04511500002 ते 21 पेठ 04511000001 ते 10 लेखाशिर्ष 22020558 -3 नगर पालिका शाळा लेखाशिर्ष 22023361 100% अनु. शाळा 12 | सुरगाणा- 04511200001 ते 11 लेखाशिर्ष 22021901 -12+3 TSP शाळा लेखाशिर्ष 22023379 100% अनु. शाळा 46 | समोरील तालुकानिहाय शाळा संलग्न असणारे उच्च माध्यमिक शाळा |
| 5 | मगंळवार दि. 16/10/2018 | नांदगाव 04510800016 ते 37 चांदवड 04510300001 ते 47 | लेखाशिर्ष 22023361 20% अनु. शाळा 04510100122 ते 214 | लेखाशिर्ष 22023379 20% अनु. शाळा 41 | समोरील तालुकानिहाय शाळा संलग्न असणारे उच्च माध्यमिक शाळा, सराव पाठशाळा व सैनिकी शाळा |

2) माहे **आक्टोबर - 2018** चे नियमित ऑफलाईन वेतन देयका मध्ये **शालार्थ ID असणा-याच व मात्र शिक्षण संचालकांची मान्यता असलेले शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांचाच सामावेश करण्यात यावा. 20% अनुदानावरील कर्मचा-यांची 100% अनुदानावर बदली करून माहे आक्टोबर - 2018 चे नियमित ऑफलाईन वेतन देयक तयार / सादर करु नये.**तसेच ज्या कर्मचा-यांना शालार्थ ID मिळालेला नाही परंतु शिक्षण संचालकांची मान्यता प्राप्त आहे अशा कर्मचा-यांचे बाबतीत शिक्षण संचालकांची मान्यता प्रत सादर करावी. **या बाबत दिनांक-21/08/2018 रोजी** दिलेल्या नमुन्यातील हमीपत्र सदर करावे.अन्यथा त्यास मुख्याध्यापक / प्राचार्य जबाबदार राहतील.

3) माहे **आक्टोबर - 2018** चे नियमित ऑफलाईन वेतन देयकात सन-2017-18 ची संचमान्यतेपेक्षा जास्त कर्मचा-यांचा वेतन देयकात सामाविष्ठ करू नये तसे आढळुन आल्यास वेतन देयक स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.(ज्यांना सन-2017-18 ची संचमान्यता मिळालेली नसेल त्यांनी तसे स्वतंत्र पत्र देयकासोबत जोडुन सन-2016-17 च्या संच मान्यतेप्रमाणे वेतन देयक सादर करावे)

4) माहे **आक्टोबर - 2018** चे नियमित ऑफलाईन वेतन देयकासोबत मागील **सप्टेबर - 2018** महिन्याचे एकुण वेतन व चालु **आक्टोबर - 2018** महिन्याचे वेतन या मध्ये असलेल्या **तफावत / फरक या बाबत दिनांक-21/08/2018 रोजी दिलेल्या सुचनेनुसार वेतन तफावत प्रमाणपत्रा मध्ये नमुद करावे. व त्यासाठी आवश्यक मान्यता,कार्यमुक्त आदेश व इतर प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा वेतन देयक स्विकारले जाणार नाही**

5) **माहे. आक्टोबर - 2018 चे वेतनदेयक दिनांक-21/08/2018 रोजी दिलेल्या सूचनेनुसार व क्रमवारीनुसारच 3 स्वतंत्र संच करूनच सादर करावे.अन्यता वेतन देयक स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

6) ज्याअनुदानित माध्यमिक,उच्च माध्यमिक,सराव पाठशाळांनी शाळास्तरावर परिक्षा फी ,कर्मचारी वसूली रक्कम शिल्लक असेल अशा शाळांनी माहे **आक्टोबर - 2018** चे Offline वेतन देयकात शाळास्तरावर शिल्लक असलेली रक्कम कमी मागवावी.व शिल्लक रक्कमेबाबत तपशिलवार स्वतंत्र माहिती प्रपत्र सादर करावे..

7) **वेतन देयक तयार करणा-या माहितगार लिपीक अथवा मुख्याध्यापक यांनीच वेतन देयक सादर करण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहावे. अन्यथा वेतन देयक स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

8) **ज्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे नियमित वेतन बॅक खाते नबंर चुकीचा असल्याने खात्यावर रक्कम वर्ग होत नाही.अशा शाळांनी वेतन देयकासोबत स्वतंत्र पत्र व IDBI बॅक पास बुक झेरॉक्स सादर करण्यात यावी.**

9) **IDBI बॅके बाबत बॅकींग व्यवहारा बाबत काहीही तक्रार / त्रुटी आपण त्या दुरध्वनी वरुन कार्यालयास कळवितात.त्या तक्रार / त्रुटी लेखी स्वरुपात वेतन देयकासोबत सादर करावव्यात.**

**टिप:--ज्या शाळांची दोन लेखाशिर्षाखाली बिले सादर केली जातात त्या शाळांनी मुख्य बिल असेल त्याच दिवशी दोन्ही बिले सादर करावीत याची नोंद घ्यावी.**

(उदय देवरे)
अधीक्षक (माध्य)
वेतन व भ.नि.नि.पथक, नाशिक

**प्रत:- मुख्य लिपीक, वेतन शाखा, अधीक्षक, वेतन भविष्य निर्वाह निधी पथक ( माध्यमिक ) जिल्हा नाशिक यांनी सर्व देयकांमधील कर्मचा-यांची नावे सप्टेबर- 2018 च्या देयकाप्रमाणेच असल्याची (कर्मचा-यांच्या नावांची) खात्री करूनच देयक स्विकारावे. परिक्षा फी / कर्मचारी वसुली, वेतन तफावत प्रमाणपत्र, हमीपत्र व सन-2017-18 ची संचमान्यता मिळालेली नसेल त्यांचे लेखी स्वतंत्र पत्र असले शिवाय माहे आक्टोबर- 2018 चे वेतन देयक स्विकारु नये.**